बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०२ । अंक – ३३८ । शुक्रवार दि.२९ ऑगस्ट २०२५ । आरएनआय – एमएएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 02 Issue - 338 Friday Dt. 29 August 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

# मराठ्याच्या महाप्रलयाने मुंबई हायजक झाली जिकडं तिकडं भगव वादळं!

सायं दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक :– दिपक थोरात मो.९८६०८९८५६४





# मुंबईत मराठा समाजाचा महासागर उसळला पोलिस यंत्रणा आणि सरकार हतबल!

## आरक्षणाच्या लढ्यासाठी मराठ्यांचा तुफान लोट; आंदोलनाला मिळाली ऐतिहासिक ताकद!

## मराठवाड्यातील सर्वपक्षीय अनेक आमदार खासदारांचा मुंबईतील आंदोलनाला जाहीर पाठिंबा

बीड (प्रतिनिधी):– मुंबईत आज अभूतपूर्व दृश्य पाहायला मिळालं, लाखोंच्या संख्येने मराठा समाज वाहनांच्या ताफ्यासह, झेंडे आणि घोषणांनी सज्ज होत अक्षरशः मुंबईत धडकला. शहराच्या प्रत्येक रस्त्यावर, गल्लीबोळात, चौकाचौकात एक मराठा लाख मराठा च्या घोषणा घुमत आहेत. या महासागरासमोर पोलिस यंत्रणा पूर्णपणे हतबल झालेली दिसतेय. प्रचंड गर्दीमुळे शहरात वाहतूक ठप्प झाली आहे. मुंबईच्या दगदगीच्या जीवनात आज मराठा समाजाने आपल्या एकतेची, ताकदीची आणि हक्कासाठीच्या जिद्दीची जिवंत साक्ष दिली आहे. आरक्षणासाठीची ही चळवळ आता निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे. ही गर्दी फक्त संख्या नाही, तर हक्कासाठी धगधगणारा ज्वालामुखी आहे. मराठा समाजाच्या या महासागराने आज पुन्हा एकदा इतिहास रचला आहे.



मुंबईत मराठ्यांचे वादळ आझाद मैदानावर दाखल झाले आहे.. गेल्या २ दिवसांपासून संघर्ष योद्धे मनोज दादा जरांगे पाटील हे मुंबईच्या दिशेने निघाले होते. या दौऱ्यात शिवजन्मभूमी शिवनेरी येथे कपाळी मातीचा टिळा लावून पाटलांनी मुंबईकडे कूच केली होती आता मनोज जरांगे पाटील मुंबईत दाखल झाले आहेत.यापूर्वी मराठे मुंबईच्या वेशीवर परतले होते.. छल कपट करत मराठ्यांना गुलाल उधळायला लावला मात्र हाती बुक्का दिला होता.. आता मात्र मराठे मुंबईत आझाद मैदानावर भर पावसात दाखल झाले आहेत यावेळी कसलाही धोका स्वीकारला जाणार नाही..

कोणताच पक्ष आणि कोणतीच संघटना इतक्या मोठ्या प्रमाणात गर्दी जमवू शकत नाही.. ही एक सामान्य शेतकऱ्याच्या पोरातील इमानदारीची ऊर्जा आहे.. जी आज मुंबईच्या रस्त्यावर दिसतेय.. मुंबईकरांना आता खरं भगव वादळ काय असतं हे दिसायला लागले आणि एक सामान्य माणूस काहीही करू शकतो मराठे आपल्या मागण्या पूर्ण करूनच आझाद मैदान या ठिकाणावरून निघणार आहेत..महायुती सरकारने रिकाम्या हाताने या मराठ्यांना पाठविल्यास त्याची किंमत सरकारला मोजावी लागेल.. त्यामुळं यावेळी जिंकूनच परतायचं आहे. मराठे अजून जे जे गावी आहेत त्यांनी मुंबईकडे यावं.. मुंबईत मुक्काम वाढला लागला तरी चालेल मात्र आता सोक्षमोक्ष लावायचा आहे. असे मत मराठा बांधवांनी व्यक्त केले आहे. मुंबईच्या आझाद मैदानावर समाज बांधव पोहोचले असून आंदोलन ठिकाणी मोठ्या प्रमाणात भगव वादळ जमा झाले आहे. संघर्ष योद्धे मनोज दादा जरांगे पाटील आझाद मैदान येथे गणरायाची स्थापना करून उपोषणाला सुरुवात केल्यावर आझाद मैदान पूर्णपणे भगवे झाले आहे.आपण समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आलो आहोत.. २ तासांत मुंबई जशी जाम केली तशी आता मोकळीही करू.. पाटलांनी समाज बांधवांशी संवाद साधला आहे.. सरकारने गोळ्या घातल्या तरी मागे हटणार नाही असं म्हणत पाटलांनी समाज बांधवांना पोलिसांना सहकार्य करायचं देखील आवाहन केलं आहे. सरकार कडे थोड्याच वेळात पुन्हा अर्ज करू असं देखील पाटील म्हणाले आहेत..



### दोन्ही आमदारांचा एकत्र प्रवास करत आंदोलनाला पाठिंबा.

बीड आणि माजलगाव विधानसभेतील मतदारांच्या मताचे चीज झाले.आदरणीय आमदार प्रकाश दादा सोळंके आणि संदीप भैय्या क्षिरसागर एकाच गाडीत बसून आंदोलन स्थळी आझाद मैदानावर संघर्ष योद्धे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या भेटीस आणि पाठिंबा देण्यासाठी पोहोचत आहेत..या आंदोलनात सुरुवातीपासून या दोन्ही आमदार साहेबांनी जाहीररित्या खुल्लमखुल्ला असा पाठिंबा या आंदोलनाला दिला आहे.. बीड आणि माजलगाव विधानसभेतील मतदारांच्या मताचे चीज झाले. असे मत मराठा समर्थकांनी व्यक्त केले आहे.

### मराठा समाजाच्या आरक्षणाच्या आंदोलनात गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांचा सक्रिय सहभाग

बीड जिल्ह्यातील गेवराई विधानसभा मतदारसंघाचे सदस्य श्री .विजयसिंह शिवाजीराव पंडित मनोज जरांगे पाटलांच्या भेटीला पोहोचले आहेत.. बीड जिल्ह्यातील ३ आमदारांनी एकाचवेळी पाठिंबा देत आंदोलनाला ताकद मिळवून दिली असून राज्यभरातील इतर आमदारांनी देखील आता पाठिंबा देणं आवश्यक आहे.. आपापल्या आमदारांना फोन करा. अशा पोस्ट सोशल मीडियावर फिरत आहेत.



### खासदार बजरंग बप्पा सोनवणे आझाद मैदानात दाखल परभणीचे खासदार बंडू बॉस यांचाही सहभाग

बीडचे खासदार बजरंग बाप्पा आणि परभणीचे खासदार बंडू बॉस यांनी आत्ताच आझाद मैदान येथे येऊन संघर्ष योद्धे मनोज दादा जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली.. २ आमदारांनी एकसोबत येऊन पाठिंबा दिला होता आता दोन खासदारांनी एकत्र येत आंदोलनाची ताकद वाढविण्याचे काम केले आहे.. बजरंग बाप्पा यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर आंदोलनास येणाऱ्या आंदोलकर्त्यांचा टोल माफ केला होता.बीड, परभणीचे खासदार आले मात्र छत्रपती संभाजीनगर, लातूर, नांदेड, धाराशिव, जालना येथील खासदार पाठिंब्यासाठी आलेले नाहीत.. त्या त्या जिल्ह्यातील समाज बांधवांनी तात्काळ मतदान दिलेल्या खासदारांना संपर्क करून मुंबईचं सांगावं. असा थेट इशारा मराठा समाजातील सेवकांनी दिला.



## संपादकीय...

# हवेचा अंदाज कसा चुकतो?

आरक्षणासाठी पुन्हा एकदा रस्त्यावर उतरलेल्या मराठा समाजाचे वादळ काल मुंबईच्या दिशेने ड्रोपावले आहे. गेल्या वर्षी लोकसभा व विधानसभा निवडणुकीपूर्वी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वात झालेले आंदोलन, त्याच्या राजकीय परिणामांविषयी झालेली चर्चा आणि अंतिमतः लोकसभा व विधानसभा निवडणुकीत आलेले परस्परविरोधी निकाल या पार्श्वभूमीवर जरांगे यांची ही नवी धडक काय वळण घेते, याकडे राज्याचे लक्ष लागणे स्वाभाविक आहे. त्याचे कारण असे की, आधी विधानसभा निवडणुकीत मराठा समाज सर्वत्र आपले उमेदवार उतरवणार, असे जरांगे यांनी सांगितले आणि नंतर कोणत्याही एका समाजाच्या बळावर राजकीय यश मिळविणे अगदीच कठीण असल्याने हा विचार सोडून दिला. लोकांनी आपापल्या मर्जीने मतदान करावे, असे आवाहन केले. अर्थातच, लोकांनी तसे स्वमर्जीने मतदान केले. परिणामी, लोकसभेला मोठा धक्का सहन कराव्या लागलेला भारतीय जनता पक्ष आणि त्याच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीला विधानसभा निवडणुकीत प्रचंड यश मिळाले. राजकीय जाणकार व विश्लेषकांनी लगेच मनोज जरांगे यांचा प्रभाव ओसरल्याचे अनुमान काढले. त्यांना मोडीत काढले. आता नव्याने राजधानी मुंबईला धडक देण्याची घोषणा जरांगे यांनी केली तेव्हा तेच अनुमान नजरेसमोर ठेवून पुन्हा त्यांना अशा आंदोलनासाठी जनसमर्थन मिळणार नाही, असाच सगळ्यांचा अंदाज होता. प्रत्यक्षात, जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथून आंदोलक मुंबईकडे निघाले तेव्हा सगळ्यांचे अंदाज फसले. सामान्य जनता, विशेषतः आरक्षणाचा लाभार्थी ठरू शकणारा तरुण वर्ग प्रचंड मोठ्या संख्येने जरांगे यांच्या पाठीशी उभा असल्याचे सुरुवातीचे चित्र आहे. येत्या दोन-तीन दिवसांत हे आंदोलन कसे वळण घेते, त्याला प्रत्यक्ष किती यश मिळते, यावर त्या समर्थनाचे मूल्य निश्चित होईल. तोवर मान्यवर राजकीय जाणकारांनी वाट पाहिलेलीच बरी.

या जाणकारांचे असेच अंदाज तिकडे बिहारमध्ये राहुल गांधी व तेजस्वी यादव या जोडगोळीनेही पार धुळीला मिळविले आहेत. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर केंद्रीय निवडणूक आयोगाने बिहारमध्ये मतदारयाद्यांची स्पेशल इन्टेन्सिव्ह रिव्हिजन किंवा 'सर' नावाने विशेष पडताळणी मोहीम चालविली आहे. त्या मोहिमेतील गोंधळ, गडबडी चर्चेत असतानाच राहुल गांधी यांनी दिल्लीत कर्नाटकातील महादेवपुरा विधानसभा मतदारसंघातील यादीच्या निमित्ताने निवडणूक आयोग व भारतीय जनता पक्षावर तोफ डागली. मतचोरीचा गंभीर आरोप केला आणि असे जनमत चोरले जाऊ नये, यासाठी नंतर बिहारमध्ये मताधिकार यात्रा सुरू केली. मुख्य प्रवाहातील माध्यमांनी सत्ताधारी भाजपच्या इशाऱ्यावर राहुल गांधी यांची पप्पू प्रतिमा तयार केली असल्याने नाही म्हटले तरी त्याचा परिणाम या मताधिकार यात्रेच्या समर्थनावर होईल, अशा भ्रमात सगळे जण होते. प्रत्यक्षात त्या यात्रेला मिळणारे समर्थन केंद्र व त्या राज्यातील सत्ताधाऱ्यांना धडकी भरविणारे आहे. विशेषतः व्होटचोरीसंदर्भातील घोषणा लाखो लहान-थोरांच्या तोंडी आहेत.

आमच्या न्यूजलेटरसाठी साईन-अप करा

दोन महिन्यांवर येऊन ठेपलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत भाजप व एनडीएला सहज यश मिळेल असे जे आधी वाटत होते, ते वातावरण बदलविण्याची ताकद या मताधिकार यात्रेत आहे, असे आता अनेक जण म्हणू लागले आहेत. थोडक्यात, जनतेच्या मनात नेमके काय आहे, हे हस्तीदंती मनोऱ्यात किंवा टीव्ही स्टुडिओमध्ये बसून कळत नाही, हे जुने मत पुन्हा अधोरेखित होऊ लागले आहे. यापासून काय धडा घ्यायचा तो संबंधित घेतीलच, तथापि, जनमानस, जनमत, लोकभावना सरळ रेषेत प्रवास करीत नाहीत, याची पुन्हा आठवण करून देण्याची आवश्यकता आहे. जरांगे, राहुल गांधी यांच्यासोबतच आणखी एक उदाहरण गरजेचे आहे. ते म्हणजे, उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांची दोन महिन्यांत तिसऱ्यांदा झालेली भेट. मराठी भाषेच्या मुद्द्यावर ठाकरे ब्रँडचे हे दोन्ही कर्तेधर्ते जवळपास दोन दशकांचे वैमनस्य बाजूला ठेवून एकत्र आले. तेव्हापासून उद्धव सेना व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमधील राजकीय युतीची चर्चा सुरू आहे. ही युती झाली तर राज्याच्या राजकारणावर मोठे परिणाम होतील. त्याविषयी आडाखे बांधताना तरी प्रत्यक्ष लोकभावना काय असू शकतील, याचे तारतम्य बाळगले जाईल, अशी अपेक्षा बाळगूया.आरक्षणासाठी पुन्हा एकदा रस्त्यावर उतरलेल्या मराठा समाजाचे वादळ काल मुंबईच्या दिशेने ड्रोपावले आहे. गेल्या वर्षी लोकसभा व विधानसभा निवडणुकीपूर्वी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वात झालेले आंदोलन, त्याच्या राजकीय परिणामांविषयी झालेली चर्चा आणि अंतिमतः लोकसभा व विधानसभा निवडणुकीत आलेले परस्परविरोधी निकाल या पार्श्वभूमीवर जरांगे यांची ही नवी धडक काय वळण घेते, याकडे राज्याचे लक्ष लागणे स्वाभाविक आहे. त्याचे कारण असे की, आधी विधानसभा निवडणुकीत मराठा समाज सर्वत्र आपले उमेदवार उतरवणार, असे जरांगे यांनी सांगितले आणि नंतर कोणत्याही एका समाजाच्या बळावर राजकीय यश मिळविणे अगदीच कठीण असल्याने हा विचार सोडून दिला. लोकांनी आपापल्या मर्जीने मतदान करावे, असे आवाहन केले. अर्थातच, लोकांनी तसे स्वमर्जीने मतदान केले. परिणामी, लोकसभेला मोठा धक्का सहन कराव्या लागलेला भारतीय जनता पक्ष आणि त्याच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीला विधानसभा निवडणुकीत प्रचंड यश मिळाले. राजकीय जाणकार व विश्लेषकांनी लगेच मनोज जरांगे यांचा प्रभाव ओसरल्याचे अनुमान काढले. त्यांना मोडीत काढले. आता नव्याने राजधानी मुंबईला धडक देण्याची घोषणा जरांगे यांनी केली तेव्हा तेच अनुमान नजरेसमोर ठेवून पुन्हा त्यांना अशा आंदोलनासाठी जनसमर्थन मिळणार नाही, असाच सगळ्यांचा अंदाज होता. प्रत्यक्षात, जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथून आंदोलक मुंबईकडे निघाले तेव्हा सगळ्यांचे अंदाज फसले. सामान्य जनता, विशेषतः आरक्षणाचा लाभार्थी ठरू शकणारा तरुण वर्ग प्रचंड मोठ्या संख्येने जरांगे यांच्या पाठीशी उभा असल्याचे सुरुवातीचे चित्र आहे.

# डॉ .वायबसेवर कारवाई करा म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न

बीड (प्रतिनिधी):- डॉक्टर असलेल्या भावावर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी रामहरी बायबसे जिल्हाधिकारी कार्यालय समोर उपोषणाला बसले होते. पण प्रशासनाने लक्ष न दिल्याने आज उपोषण कर्त्याने अंगावर डिझेल ओतून घेत आत्मदहनाचा प्रयत्न केला. परंतु वेळीच पोलिसांनी प्रसंगावधान दाखवून रोखल्याने अनर्थ टळला. या घटनेने जिल्हाधिकारी कार्यालयात काहीवेळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. आंदोलकास पोलिसांनी ताब्यात घेऊन जिल्हा रुग्णालयात दाखल केले. केज तालुक्यातील कासारी येथील रामहरी महादेव यायबसे यांचे मागील पंधरा दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर

पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रसंगावधानामुळे अनर्थ टळला



थेमुदत उपोषण सुरू आहे. रामहरी यायषसे यांना त्यांचे सख्खे भाऊ डॉक्टर संभाजी यायबसे यांच्याकडून अनेकदा मारहाण झाली. याच प्रकरणात डॉक्टर वायबसे यांच्यावर कारवाई केली जावी. या मागणीसाठी रामहरी वायबसे यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू होते. मात्र या उपोषणाची प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याने संतप्त वायबसे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात अंगावर डिझेल

ओतून घेत आत्मदहनाचा प्रयत्न केला. दरम्यान परिसरात डिझेल पसरल्याने वायबसे यांना बचाव करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या महिला पोलीस कर्मचारी कोसळल्या ही घटना मोबाईल कॅमेऱ्यात चित्रीत झाली आहे. महिला कर्मचाऱ्यामुळे होणारा अनर्थ टळला आहे. पण अचानक घडलेल्या या प्रकाराने जिल्हाधिकारी कार्यालयात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# उद्धव-राज आणि फडणवीस : काहीतरी 'मेख' आहे!

गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी 'राज'कीय भेटी झाल्या, उद्धव ठाकरे हे राज ठाकरेंकडे सहकुटुंब पोहोचले. काही तासांतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही गेले. फडणवीस-राज यांच्यात बंदद्वार चर्चा झाली, नेमके काय घडले असावे? एक मात्र नक्की. राज ठाकरे उद्धव यांच्यासोबत जाणार असे चित्र असताना, ते फडणवीस यांच्याही तितक्याच संपर्कात असतात; यात काहीतरी मेख नक्की आहे. महापालिका निवडणुकीपूर्वी महायुती-महाविकास आघाडीचे स्वरूप निश्चित होईल, तेव्हा ही मेख नेमकी काय होती, याचा अर्थ महाराष्ट्राला कळेल.



जातीय ध्रुवीकरणाच्या राजकारणाने सध्या पुन्हा एकदा उचल खाल्ली आहे. या ध्रुवीकरणाचे परिणामही आगामी निवडणुकांवर संभवतात. फडणवीस यांच्यावर वैयक्तिक टीका केली म्हणून भाजपचे काही छोटे नेते मनोज जरांगे-पाटील यांच्यावर टीका करत आहेत; पण चंद्रशेखर बावनकुळे ज्या पद्धतीने फडणवीसांसाठी ढाल बनले आहेत, तसा अन्य कोणी मोठा नेता समोर येताना दिसत नाही. पक्ष म्हणून भाजपची भूमिका नेमकी कळत नाही.

उपराष्ट्रपती निवडणूक : चमत्कार होईल का?

उपराष्ट्रपती पदाची निवडणूक ९ सप्टेंबरला आहे. एनडीएचे सी. पी. राधाकृष्णन विरुद्ध इंडिया आघाडीचे न्या. बी. सुदर्शन रेड्डी असा सामना होत आहे. महाराष्ट्राचा विचार करता उत्सुकता एकाच गोष्टीची आहे की, महायुतीकडे आहेत त्यापेक्षा अधिकची मते त्यांना मिळतील का? केंद्रात आणि राज्यात भाजपची सत्ता आहे. राधाकृष्णन यांची उमेदवारी जाहीर झाल्यापासून फडणवीस यांनी एक धागा पकडला आहे, तो असा की, राधाकृष्णन महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत, ते इथलेच मतदारदेखील आहेत, एकप्रकारे ते महाराष्ट्राचेच आहेत आणि म्हणून प्रादेशिक अस्मितेची भाषा करणारे शरद पवार गट, उद्धवसेना यांनी राधाकृष्णन यांना पाठिंबा द्यावा. 'आमचा इंडिया आघाडीचा उमेदवार आहे,' असे सांगत शरद पवार यांनी राधाकृष्णन यांना पाठिंबा देणार नसल्याचे स्पष्ट संकेत दिलेले आहेत. उद्धव ठाकरे यांनी मात्र अद्याप भूमिका जाहीर केलेली नाही. रेड्डी शुक्रवारी 'मातोश्री'वर जातील, त्यानंतर ठाकरे त्यांना पाठिंबा जाहीर करतील असे दिसते.

या निवडणुकीत व्हिप नसतो. सदसद्विवेकबुद्धीने लोकसभा आणि राज्यसभेच्या खासदारांनी मतदान करावे असे अपेक्षित असते. 'आपण चमत्कार करू शकतो' असे देवेंद्र फडणवीस यांनी २०२२ मधील राज्यसभा, विधान परिषदेच्या निवडणुकीत दाखवून दिले होते. या चमत्काराची पुनरावृत्ती उपराष्ट्रपती निवडणुकीत होईल का, याची उत्सुकता आहे. महाविकास आघाडीकडे लोकसभा व राज्यसभा मिळून महाराष्ट्रात ३८ मते आहेत; तर महायुतीकडे २९ मते आहेत. आपला मतांचा आकडा वाढावा, हा देवेंद्र फडणवीस यांचा निश्चितच प्रयत्न आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मदतीने त्यांनी काही खेळी खेळली तर कदाचित वेगळेही घडू शकेल. आपले एकही मत फुटता कामा नये यासाठी महाविकास आघाडीचे नेते अजूनही एकत्रित बसलेले नाहीत. तिकडे महायुती धक्का देण्याच्या तयारीत आहे.

भाजपचे काय चालले आहे?

'लाखमोलाच्या जनतेचा रविदादावर जीव हाय २... असं प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे गुणगान गाणारं गीत गेल्या आठवड्यात वारंवार वाजवलं जात होतं. लाडक्या बहिणींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लाखो राख्या प्रदान करण्याचा समारंभ झाला तेव्हाचा हा प्रकार. मुंडे, गडकरी, फडणवीस प्रदेशाध्यक्ष होते तेव्हा असं गीत नव्हतं; पण हा बदललेला भाजप आहे; आणखीही बदलत जाईल. व्यक्तिस्तोमाला थोडी सुरुवात आधीच झालेली होती, रवींद्र चव्हाण तो कॅन्व्हास मोठा करताना दिसतात. मुंबईचे अध्यक्ष असताना आशिष शेलार असे काही करत नसत. नवे अध्यक्ष अमित साटम हे पथ्य पाळतील अशी अपेक्षा आहे. साटम हे श्रीश्री रविशंकर यांचे भक्त आहेत. तणावमुक्त जीवन जगण्याची कला 'आर्ट ऑफ लिव्हिंग' श्रीश्री सांगत असतात. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर मुंबई भाजपलाही अंतर्गत तणावमुक्तीची गरज आहे. साटम यांनी त्यासाठीचा फॉर्म्युला आणाता, शेलार है उद्धव ठाकरे, राज ठाकरेंच्या सोडीचे वाटत होते. त्यामुळे त्यांची विधाने, प्रतिक्रियांना माध्यमे चांगली जागा देत असत. अमित साटम हे आदित्य ठाकरेंच्या तोडीचे वाटतात. त्यापेक्षा अधिकची उंची स्वतः गाठण्याची संधी मुंबई अध्यक्षपदाच्या रूपाने त्यांच्याकडे चालून आली आहे. साटम मराठी आहेत.

पान ४ वरून..

### दिंद्रुड येथील सत्यशोधक मातंग समाज मेळाव्यास उपस्थित रहा - विशाल गवळी

आमदार अमित गोरखे उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रवादीचे नेते रमेशराव आडसकर यांची विशेष उपस्थिती असणार आहे. राष्ट्रीय मानवी हक्क अभियान चे अध्यक्ष प्रा. मिलिंद एकनाथराव आव्हाड व वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष कसबे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे सुप्रसिद्ध गायक रणजीत खंडागळे यांच्या समाज प्रबोधन बहारदार गीतांचा कार्यक्रम होणार आहे. मागील अनेक वर्षांपासून युवा नेते बाबा कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिंद्रुड येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जन्मोत्सव सोहळा अगदी भव्य दिव्य स्वरूपात साजरा होतो. यावर्षी जयंती सोबतच सत्यशोधक मातंग समाज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. विखुरलेल्या समाजाला संघटित करून योग्य दिशा देण्यासाठी हा मेळावा निर्णय ठरणार आहे. तरी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते विशाल गवळी यांनी केले आहे.

---------------------

### ना. पंकजाताई मुंडेंनी दिले निर्देश ; जिल्ह्यातील उद्योजकांच्या मागणीची तातडीने घेतली दखल

प्रादेशिक अधिकारी मनिष होळकर यांनी परिपत्रक काढले असून बीड येथील उद्योजकांच्या तसेच औद्योगिक संघटनांच्या अडी-अडचणी / समस्यावरील चर्चा करणेसाठी व निवारण करणेसाठी उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जालना हे आठवड्याच्या प्रत्येक बुधवारी, जिल्हा उद्योग केंद्र, संचेती बिल्डिंग, गुड लक हॉटेल जवळ, एम.एस.ई.बी. ऑफिस समोर, जालना रोड, बीड येथे उपलब्ध असतील असे म्हटले आहे.

---------------------

### मांजरा धरणाचे सहा वक्र दरवाजे उघडले

होणारी पाण्याची आवक पाहून विसर्गात वाढ अथवा कपात करण्याचानिर्णय घेण्यात येईल,असे धरण प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. धरणातून सुरू असलेल्या विसर्गामुळे मांजरा नदीपात्रातील पाणीपातळी वाढणार असून नदीकाठावरील तसेच पुरग्रस्त होऊ शकणाऱ्या गावांतील नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी,असा इशारा मांजरा प्रकल्प धनेगाव पुर नियंत्रण कक्ष यांच्याकडून देण्यात आला आहे.

---------------------

### दाधिच समाजात ऋषी पौर्णिमा निमित्त रक्षाबंधन उत्साहात साजरा

भावांच्या मनगटावर राखी बांधतात, तर भाऊ बहिणींना भेटवस्तू देतात आणि त्यांचे संरक्षण करण्याचे वचन देतात. या परंपरेमुळे कौटुंबिक संबंध अधिक घट्ट होतात.दाधिच समाजात ऋषी पौर्णिमा आणि रक्षाबंधन एकत्र साजरे केले जाते. या दिवशी दाधिच समाजातील बहिणी आपल्या भावांच्या मनगटावर राखी बांधून त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करतात आणि भाऊ बहिणीच्या संरक्षणाचे वचन देतो. हा सण प्रेम व कर्तव्य यांचे प्रतीक असून कौटुंबिक संबंधांचे भाऊ बहिणीला संरक्षणाचे वचन देतात. दाधिच समाजात ऋषी पौर्णिमेला रक्षाबंधन साजरी केली जाते. या दिवशी दाधिच समाजातील भगिनी आपल्या भावांच्या मनगटावर राखी बांधतात आणि त्यांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करतात. हा सण भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचे आणि माहात्म्याचे प्रतीक आहे. या निमित्ताने समाजात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात, कौटुंबिक एकत्र येणे आणि सामूहिक भोजनाचा आस्वाद घेत कुटुंबात आनंद साजरा केला जातो.

---------------------

### तलवाडा ग्रामपंचायत प्रशासक, ग्रामसेवक आणि महसुल विभाग

ग्रामपंचायतचे प्रशासक चोपडे साहेब व ग्रामसेवक मुसळे साहेब आणि प्रशासन राहील,अतिक्रमण तलाव संरक्षण भींती लगटच्या आतिक्रमण संदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने गाव तलाव फुटण्याचा धोखा लक्षात घेऊन संरक्षण भिंती लगटच्या आतिक्रमण उठवण्या संदर्भात मागणी केलेली होती. त्यास आणुसरुन प्रशासनाने संबधित आतिक्रमण धारकांना दिलेल्या नोटीसाचा कालावधी आज रोजी संपत आसतांना गाव तलाव हे पाठीमागच्या बाजुने फुटण्याचा मार्गावर असताना तलवाडा ग्रामपंचायत ग्रामसेवक,प्रशासक व महसुल विभाग निंद्रास्त झोपेत दिसुन येत असल्याने गावक-यातुन तनावपूर्ण आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. महसुल व तलवाडा ग्रामपंचायत प्रशासक गाव तलाव फुटल्यावर कुंभकर्ण झोपेतुन जागणार का आसा प्रश्न गावक-यातुन उपस्थित केला जात असुन तलाव फुटल्यास सर्वस्वी जबाबदारी तलवाडा ग्रामपंचायत ग्रामसेवक मुसळे व प्रशासक चोपडे आणि महसुल विभागाची राहिल अशी तलवाडा गाव व पंचक्रोशीतील नागरिक करीत आहे

---------------------

### आजोबाच्या स्मृतिदिनी शिक्षक

वाकळे,मदन भाऊ आर्दड, मधुकर आर्दड, महादेव आर्दड, बंधू राजाभाऊ आर्दड, शाळेचे मुख्याध्यापक आदी मान्यवर उपस्थित होते.

या बाबतीत अधिक माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील श्रीपत अंतरवाला येथील मूळ रहिवासी असलेले आदर्श शिक्षक दिगांबर आर्दड सर यांच्या आजोबांचा नुकताच स्मृतीदिन होता. आपले आजोबा कै. निवृत्ती लिंबाजी आर्दड यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने व्यर्थ खर्च न करता श्री दिगंबर आर्दड सर यांनी शाळेला पुस्तके भेट देण्याचा मानस त्यांच्या पत्नी सौ. मुक्ता आर्दड यांच्याकडे बोलून दाखवला. त्यांच्या पत्नी ह्याही शिक्षण क्षेत्रात शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. शिवाय या नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. त्यामुळे त्यांच्या पत्नी सौ. मुक्ता आर्दड मॅडम यांनी या स्तूत्य उपक्रमाला साथ दिली. त्यानुसार श्री दिगंबर आर्दड यांनी श्रीपाद अंतर्वाला जिल्हा परिषद शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्यावर थोर साधु, संत महापुरुषांच्या विचारांचा प्रभाव पडावा त्यांना चांगले शिक्षण मिळावे. ते सर्व मुले प्रगल्भ विचारवंत व्हावीत या विचाराने प्रेरित होऊन विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाला पुरक असलेली थोर वैज्ञानिक, थोर महापुरुष, थोर विचारवंत, प्रेरणादायी महाराष्ट्रातील स्त्रियांच्या जीवन संघर्ष, यशस्वी व्यक्तींच्या यशोगाथा असे जवळपास पाच हजार रुपये किंमतीच्या पुस्तकांचा संच शाळेस भेट दिला. यावेळी गावातील आध्यात्मिक रत्न श्री. विजय महाराज आर्दड यांनी सखोल मार्गदर्शन केले. या वेळी बोलताना म्हणाले की, या गावचे भूमिपुत्र आदर्श शिक्षक श्री दिगंबर आर्दड यांच्या आजोबा फार पुण्यवान व्यक्तिमत्वाचे होते. त्यांचाच वारसा सध्या ते चालवत आहेत. आपल्या आजोबाच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांनी इतर विधीला होणारा खर्च टाळून हा खर्च विद्यार्थ्यांसाठी सत्कार्मी लावला आहे. आज त्यांनी जिल्हा परिषद शाळेच्या बाल विद्यार्थी ग्रंथालयासाठी पाच हजार रुपये किंमतीची पुस्तके भेट दिली आहेत. शाळेसाठी लागणारे शालेय पुस्तके भेट देऊन श्री दिगंबर आर्दड सर यांनी समाजासमोर एक नवीन आदर्श निर्माण केला. त्यांच्याप्रमाणे प्रत्येक नागरिकांनी आपल्या परिसरातील शाळांना आवश्यक ते शालेय साहित्य देऊन विद्यार्थ्यांचे उज्वल भवितव्य घडविण्यासाठी हातभार लावला पाहिजे असे आवाहन करत उपस्थिततांना सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी काही निवडक मान्यवरांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वतः श्री दिगंबर आर्दड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शाळेचे मुख्याध्यापक श्री शेळके सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी श्री. हरिभाऊ निवृत्ती आर्दड, सरपंच उमेश आर्दड, ज्ञानोबा बापू आर्दड, आसाराम भाऊ आर्दड,अंकुशराव आर्दड, तूळसिदास भाऊ आर्दड, वैजिनाथ आर्दड, देवीदास जिजा आर्दड, नारायण वाकळे,मदन भाऊ आर्दड, मधुकर आर्दड, महादेव आर्दड, बंधू राजाभाऊ आर्दड, बालू तात्या आर्दड, परमेश्वर शितोळे, रघूनाथ शितोळे, बद्रीनाथ आर्दड, बप्पा आर्दड, जालिंदर वाकळे, माधव आर्दड, श्रीपाद आर्दड, अथर्व आर्दड यांच्यासह जेष्ठ नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------------------

### आघाडीतील शिलेदार आता शहरातील रस्ते तयार करून का घेत नाहीत?

कामाची प्रत्यक्षात सुरुवात झाली तेव्हा आघाडीतील काही शिलेदारांनी हा रस्ता आमच्यामुळेच झाला अशी आवई उठविली होती. आता याच बीड शहरातील १) छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, कारंजा टॉवर, बलभीम चौक मार्गे चांदणी चौक पर्यंत चा रस्ता २) राजुरी वेस ते बुंदलपुरा, कबाड गल्ली मार्गे माळीवेस पोलीस चौकी पर्यंत चा रस्ता ३) कारंजा टॉवर ते जुनी भाजी मंडई मार्गे बुंदलपुरापर्यंतचा रस्ता ४) बलभीम चौक ते धोंडीपुरा मार्गे माळीवेस पर्यंत चा रस्ता ५) सुभाष रोड ते जिल्हा स्टेडियम चा रस्ता ६) किल्ला मैदान, कागज़ी दरवाजा, काली मस्जिद, भीम नगर परिसरातील रस्ते ७) अहेमदनगर रोड ते धानोरा रोड ८) मुहम्मदिया कॉलनी या मुस्लिम बहुल भागात असलेल्या सर्व नागरी वसाहतीतील सर्व रस्ते तयार करून घेण्याकरिता आता आघाडीतील शिलेदार का पुढे येत नाहीत? असा सवाल मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि एमआयएम चे सय्यद इलयास यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून उपस्थित केला आहे.

# जिल्ह्यात ६५ दिवसात २२१ शाळेत १लाख ६० हजार वह्या व शालेय साहित्य वाटप

## प्रयास फाउंडेशन मुंबई व गुरु आनंद महिला प्रतिष्ठान चा कौतुकास्पद उपक्रम





बीड (प्रतिनिधी):- बीड शहरातील गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा तथा ज्येष्ठ समाजसेविका सौ सीमा ओस्तवाल यांनी गेल्या दोन अडीच महिन्यात ग्रामीण भागासह शेरी भागातील जिल्हा परिषद शाळेत जात ज्येष्ठ नागरिक, पत्रकार, राजकीय, सामाजिक, अधिकारी, डॉक्टर, वकील तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत गेल्या दोन अडीच महिन्यात बीड शहरासह ग्रामीण भागातील जिल्हा परिषद व प्रार्थमिक माध्यमिक विद्यालयात प्रयास फाउंडेशन मुंबई व गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या माध्यमातून प्रत्येक शाळेत जात विद्यार्थ्यांना वह्या, पेन्सिल खुटलबर पाट्या, पेन, व शालेय साहित्य वाटप केले. बीड शहरात व ग्रामीण भागातील गेल्या ६५ दिवसात २२१ शाळेत १लाख ६० हजार वह्यांचे **द प्राथमिक शाळा गजपिंप** यशस्वीरीत्या वाटप केले आहे. बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून यांचा उपक्रम सातत्याने सुरू सुरू आहे. या शैक्षणिक चालू वर्षात जिल्हा परिषद व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वह्या वाटपाचे कार्य दैनंदिन ६५ दिवस चालू राहिले. या दिवसात बीड शहरासह जिल्ह्यातील विविध मान्यवरांच्या उपस्थित विविध शाळेत परिसरात हा कार्य कार्यक्रम संपन्न झाला. प्रयास फाउंडेशन मुंबई व गुरु आनंद महिला प्रतिष्ठानचे अध्यक्षा सौ सीमा ओस्तवाल यांना सहकार्य केले सर्व

ज्येष्ठ समाजसेवक, पत्रकार, वकील, डॉक्टर, विविध क्षेत्रातील अधिकारी यांच्या उपस्थितीत ठिकठिकाणी कार्यक्रम पार पडले. गोरगरीब वस्त्यात झोपडपट्टीमध्ये अन्नदानाचे वाटप करण्यात येतं. थंडीमध्ये स्वेटरचा वाटप करण्यात येतं असे असंख्य उपक्रम गुरु आनंद महिला प्रतिष्ठान हे सातत्याने राबत आहे आणि याही वर्षी गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या वतीने जून जुलै ऑगस्ट या तीन महिन्यात शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले या कार्यक्रमाला अनेक सामाजिक कार्यकर्ते वेगवेगळ्या पदावरचे अधिकारी पत्रकार बांधव गावातील प्रतिष्ठित नागरिक शाळेतील सर्व शिक्षक मुख्याध्यापक पालक गावचे सरपंच शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य अशा अनेक मान्यवरांनी या शैक्षणिक साहित्य वाटपाच्या कार्यक्रमाला उपस्थिती लावली.

# सातव्या वेतन आयोगाचा ५ वा हप्ता देण्यात यावा

## – नगर परिषद कर्मचाऱ्यांचे उपोषण



माजलगाव (प्रतिनिधी):- माजलगाव येथील नगर परिषदेतील सर्व कर्मचारी सातव्या वेतन आयोगाचा पाचवा हप्ता तात्काळ मंजूर करण्यात यावा, या मागणीसाठी दिनांक २८ ऑगस्ट रोजी नगर परिषद कार्यालय माजलगाव येथे उपोषणास बसले आहेत.

यापूर्वी दिनांक २१ ऑगस्ट रोजी नगर परिषद मुख्याधिकारी यांना याबाबत लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र वारंवार मागणी करूनही दखल न घेतल्यामुळे सर्व कर्मचारी वर्गामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या उपोषणात विशाल शिंदे, कैलाश भिसे, गोविंद साबळे, श्रावण ढगे, बन्सी वाघमारे, राम मिसाळ, एकनाथ टाकणखार, दिनकर कांबळे, चत्रभुज मिसाळ, आनंत वाघमारे, सय्यद आरेफ, सिकंदर खान, नसरूल्ला खाँ, रईसोद्दीन इब्राहीम, रावईबाई भोले, मालनबाई साळवे, केशरबाई साळवे, गंगुबाई डोंगरे, साळुबाई कांबळे, लक्ष्मीबाई वाल्मिकी, शोभाबाई वाल्मिकी, मिराबाई आलझेंडे, चंद्रकलाबाई जावळे, मिराबाई रांजवण, छायाबाई, रमेश भिसे, अक्षय गालफाडे, राजु वाल्मिकी, राजाभाऊ मिसाळ, संजय ससाणे, मळीबा ससाणे, अमोल टाकणखार, शाम राठोड, प्रकाश शिंदे, रंजित रोमन यांच्यासह इतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.आमची मागणी पूर्ण झाल्याशिवाय उपोषण मागे घेतले जाणार नाही, असा ठाम इशारा कर्मचाऱ्यांनी या वेळी दिला आहे .

# परळी तालुक्यातील कासारवाडीचा 'बोरणा' तलाव १०० टक्के भरला



परळी वैजनाथ (प्रतिनिधी):- मध्यम प्रकल्प १०० टक्के भरला आहे. तालुक्यातील जलसाठे भरत असल्याने समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. परळी चा मुख्य जलस्त्रोत असलेल्या नागापूर येथील वाण प्रकल्पात यापुर्वीच १०० पाण्याचा साठा झालेला आहे व सध्यस्थितीत पाण्याचा मोठा ओघ सुरू आहे.

परळी तालुक्यात चांगला पाऊस सुरू झाला आहे. त्यामुळे सर्वत्र पाणी साठवण होण्यासाठी मोठी मदत होत आहे. परळी तालुक्याचा मुख्य जलस्त्रोत नागापूर येथील 'वाण प्रकल्प' पूर्ण क्षमतेने भरलेला आहे. तालुक्यातील बोधेगाव, करेवाडी, चांदापुर, कन्हेरवाडी, गुट्टेवाडी, मोहा, मालेवाडी, गोपाळपुर, खोडवा सावरगाव, दैठणाघाट, करेवाडी आदींमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साठवण होण्यास सुरुवात झाली आहे.

बोरणा तलावाच्या सांडव्यावरुन पाणी प्रवाहित .

दरम्यान परळी पासून जवळच असलेल्या कासारवाडी येथील बोरणा तलावात १०० टक्के पाणीसाठा झाला आहे. मध्यम प्रकल्प असलेल्या बोरणा प्रकल्पाची प्रकल्पिय पाणीसाठा क्षमता १०. ८१४ द. ल. घ. मी. एवढी आहे. मृतसाठा १.८४२ द. ल. घ. मी. इतका असून सद्यस्थितीत बोरणा प्रकल्पात सांडव्यावरुन पाणी प्रवाहित झाले आहे. तालुक्यातील नागापुर वाण, बोधेगाव, करेवाडी , कन्हेरवाडी, मालेवाडी , तांदुळवाडी , मोहा ,चांदापुर ,गुट्टेवाडी,खोडवा सावरगाव, दैठणाघाट आदींसह पाझर तलाव, साठवण तलाव, शेततळे, लघु व मध्यम प्रकल्प, बंधारे, नद्या, ओढे, विहिरी पूर्ण क्षमतेने भरली जात आहेत .जलसाठे संपूर्ण क्षमतेने भरण्याच्या स्थितीत असल्याने समाधानकारक परिस्थिती निर्माण झाली आहे.

# बीड जिल्ह्यात भ्रष्टाचार निर्मूलन समित्यांचा सुळसुळाट

## भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या नावाने ब्लॅकमेलिंग करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा-सय्यद सलीम बापू

बीड / प्रतिनिधी



जिल्ह्यात भ्रष्टाचार निर्मूलन समित्यांचा सुळसुळाट झाला असून भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या नावाने माहितीचा अधिकार व निवेदने देऊन ब्लॅकमेलिंग करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावी अशी मागणी आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी केली आहे.

असे की,मागील काही वर्षापासून बीड जिल्ह्यात भ्रष्टाचार निर्मूलन समित्यांचा सुळसुळाट झाला या समित्यांचे पदाधिकाऱ्यांकडून ब्लॅकमेलिंग करण्याचे प्रकार खुलेआम होत आहे.जिल्हाधिकारी कार्यालय,जिल्हा परिषद कार्यालय,पंचायत समिती,नगरपरिषद, तहसील कार्यालय,सार्वजनिक बांधकाम विभाग इत्यादी कार्यालयात आणि विशेष करून शैक्षणिक संस्थांवर माहितीचा अधिकार व निवेदाने टाकून भ्रष्टाचार च्या नावाने ब्लॅकमेलिंग करून पैसे उकडण्याचे काम केले जात आहे.भ्रष्टाचार समितीच्या नावाने एकच व्यक्ती वारंवार त्याच कार्यालयात माहितीचे अर्ज टाकून मिरवतांना दिसत आहे.भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष व राष्ट्रीय अध्यक्ष असे स्वतःसाठी स्वतःच अशी पदे तयार करून शासकीय कार्यालयात मिरवून अधिकारी व कर्मचाऱ्यांवर दबाव टाकून ब्लॅकमेलिंग करण्याचे गोरख धंदे केले जात आहे.अशा सर्व भामट्यांवर वचक आणण्याची गरज आहे. माननीय जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या अंतर्गत शासकीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती कार्यरत असताना जिल्ह्यात स्वयंघोषित अनेक भ्रष्टाचार निर्मूलन समिती कार्यरत असल्याचे दिसत आहे.सहाय्यक धर्मदाय आयुक्त कार्यालय यांना भ्रष्टाचार निर्मूलन समिती या नावाने समित्या नोंद करून देण्याचा अधिकार आहे का ? जिल्ह्यामध्ये भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या नावाने अशा किती समित्या आहे व त्या समित्यांचे पदाधिकारी कोण - कोण आहे ? व त्यांच्याकडे किती संपत्ती आहे व ती संपत्ती कुठून आली आहे ? याची माहिती जिल्हाधिकारी साहेबांनी घेऊन अशा भामट्य ब्लॅकमेलिंग करणाऱ्या भ्रष्टाचार निर्मूलन समित्या व त्या समित्यांचे पदाधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावी अशी मागणी आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या एका पत्रकातून केली आहे.

# अखंड हरिनाम सप्ताहाची शांतीब्रह्म तुकाराम महाराज भारती यांच्या काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय सांगता



लिंबागणेश :- (दि.२९) बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपतीच्या पावनभूमीत भरविण्यात आलेल्या अखंड हरिनाम व गणेश नाम सप्ताह सोहळ्याची सांगता काल दि.२८ गुरुवारी झाली. सांगतेचा सोहळा महंत शांतीब्रह्म तुकाराम महाराज भारती, मठाधिपती श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाला.

तुझिये संगती जाली आमुची निश्चिंती; नाही देखिले ते मिळे! भोग सुखाचे सोहळे! या जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाच्या ओव्यांनी आणि दाखल्यांनी मन हेलावणारे सुश्राव्य कीर्तन रंगले. संतसाहित्याचा आधार घेत भगवंताच्या सहवासाचे महत्त्व अधोरेखित करत भक्तांना अध्यात्मिक उन्नतीचा संदेश दिला.

दि.२१ ते २८ या सप्ताहकाळात भालचंद्र मंदिर सभामंडपात ह.भ.प. अक्षय महाराज पिंगळे (बीड), ह.भ.प. एकनाथ महाराज गाडे (चकलांबा), ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कोटुळे (आळंदी देवाची), ह.भ.प. बबन महाराज मंझरीकर, ह.भ.प. गुरूवर्य सिमामाई धर्मराज महाराज पाटील (सामनगावकर), ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे (बंकट स्वामी संस्थान, नेकनुर), वैराग्यमूर्ती रामकृष्ण रंधवे (बापू, विठ्ठलगड पाटोदा) आदी नामवंत कीर्तनकारांनी विविध विषयांवर समाजप्रबोधन केले. सप्ताहभर हरिजागर, दुपारची प्रवचनसेवा आणि धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. सांगतेनिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तनात ह.भ.प. महादेव भारती महाराज (बेलेश्वर संस्थान), गुरुवर्य धर्मराज दादा (सामनगाव), राजू लोखंडे (पाटोदा), खुळे महाराज (वैजाळा), शहादेव महाराज येडे (मोरगाव), विष्णू महाराज घरत (महाजनवाडी), गायक किशोर महाराज येडे,अशोक येडे (मृदंगाचार्य) यांनी उपस्थित राहून किर्तनात रंग भरला.

# पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या आमेर अजमेर पठाणच्या कुटुंबियांना धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून प्रशासनाकडून चार लाखांची मदत



परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी) – परळी वैद्यनाथ तालुक्यातील पांगरी परिसरातील पुलाच्या कामावर असताना परळी शहरातील कामगार आमेर अजमेर पठाण या तरुणाचा पुराच्या पाण्यात वाहून जाऊन मृत्यू झाला होता; परळीचे आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून सदर तरुणाच्या कुटुंबीयांना आज प्रशासनाच्या वतीने चार लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक नेते तथा जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे यांच्यासह परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या हस्ते या चार लाखांच्या धनादेशाचे वितरण पठाण यांच्या वारसांकडे करण्यात आले. धनंजय मुंडे यांनी आपत्ती व्यवस्थापन मधून मयत कामगाराच्या वारसांना आर्थिक साहाय्य करण्याचे निर्देश तहसीलदार तथा स्थानिक प्रशासनास दिले होते त्या अनुषंगाने ही मदत तातडीने करण्यात आली. याप्रसंगी युवक नेते अजय मुंडे, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, माजी उपनगराध्यक्ष आयुब भाई पठाण, अजीज कच्ची, रवी मुळे, अल्ताफ पठाण, नय्युम शहा, राजू भाई, बद्दल भाई, स्थानिक चे तलाठी विष्णू गीते, खाजाभाई, जफर भाई, बकश भाई, अन्सारी सर यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम




केज (प्रतिनिधी):- केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त व दहिहंडी उत्सवा निमित्त मुलांचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला.

याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील ग्रामीण भागात अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या व इंग्रजी माध्यमाचे उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण देणाऱ्या श्री संस्कार एज्युकेशन ग्रुपच्या श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये मागे होवुन गेलेल्या स्वातंत्र्य दिनानिमित्त व दहिहंडी उत्सवा निमित्त मुलांचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, स्त्री शिक्षणाच्या शिल्पकार क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले, विद्या देवता माता सरस्वती चे पुजन व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर मा. रमेश भिसे साहेब, सचिव जनविकास सेवा भावी संस्था केज, संजीवनी राऊत, काकासाहेब कोल्हे सर यांनी श्री संस्कार एज्युकेशन ग्रुप च्या पुढील वाटचालीसाठी गौरवोद्गार काढून शुभेच्छा दिल्या. त्यानंतर श्री संस्कार इंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त भाषणे व श्री कृष्ण चरित्र गीते, गवळणी व देश भक्ती पर गीतांवर बहारदार नृत्य सादर केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. रमेश भिसे साहेब सचिव जनविकास सेवा भावी संस्था केज हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच सौ. रोहिणीताई सुनील देशमुख, कैलास पाटील सरपंच साळेगांव, रब्बानी सर, अध्यक्ष जिनीयस इंग्लिश स्कूल, ह.भ.प. आबा महाराज मेहरकर, काकासाहेब कोल्हे सर, संजीवनी राऊत, सुनील बापू देशमुख, ग्रामपंचायत सदस्य बालाजी राऊत, रामभाऊ गलांडे, शहाजी अप्पा गलांडे, रजनी देशमुख मॅडम, बापुराव तोंडे, ज्ञानेश्वर भांगे, पत्रकार ज्योतीराम सावंत, रामदास सपाटे, अमोल कापरे, अतुल देशमुख, श्री संस्कार इंग्लिश स्कूल चे अध्यक्ष अनिल गलांडे हे होते. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रिन्सीपल सीमा काळे, व त्यांच्या शिक्षक टिमने परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष अनिल गलांडे यांनी केले तर सूत्रसंचालन आरती आचार्य मॅडम व सीमा काळे मॅडम यांनी केले.

# दिंद्रुड येथील सत्यशोधक मातंग समाज मेळाव्यास उपस्थित रहा - विशाल गवळी

## आ. अमित गोरखे ओमप्रकाश शेटे डॉ.मिलिंद आव्हाड भास्कर शिंदे दीपक थोरात यांची उपस्थिती



दिंद्रुड (प्रतिनिधी):- येथील जुना बस स्थानक परिसरात आयोजित करण्यात आलेल्या सत्यशोधक मातंग समाज मेळावा व लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या सार्वजनिक जयंती महोत्सवास उपस्थित राहण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते विशाल गवळी यांनी केले आहे. युवा नेते बाबा कांबळे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या भव्य दिव्य मेळाव्यास समाजभूषण आमदार अमित गोरखे उपस्थित राहुन मार्गदर्शन करणार आहेत.

याबाबत प्रसिद्धीसाठी देण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे की, प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे सत्यशोधक लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा सार्वजनिक जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष देवदूत डॉ. ओमप्रकाश शेटे हे असतील. तर उद्घाटक म्हणून समाजभूषण पान २ वर...

बीड जिल्ह्यामध्ये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या वेगवेगळ्या जयंती होतात परंतु बाबा कांबळे यांच्या जयंतीनिमित्त बीड जिल्ह्यातील सर्व समाज बांधवांचे लक्ष वेधले जाते यातच आता विधान परिषदेचे आमदार अमित घोडके आरोग्यदुत ओम प्रकाश शेटे मानवी हक्क अभियान चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ मिलिंद आव्हाड महाराष्ट्रातील संस्थापक अध्यक्ष दीपक थोरात यांची उपस्थिती लाभणार आहे. दिंद्रुड येथे बीड जिल्ह्यातील सर्वात मोठी जयंती साजरी होती ही जयंती साजरी करण्यासाठी बाबा कांबळे हा कार्यकर्ता दरवर्षी स्वखर्चाने कार्यक्रमाचे आयोजन करतो समाजाचा खरा नायक म्हणून बाबा कांबळे ची ओळख आहे या सर्वांच्या महत्त्वाच्या भूमिके मध्ये नियोजनबद्ध कार्यक्रमाचे पूर्व तयारी व मार्गदर्शक म्हणून ज्यांची ओळख आहे असे सुधाकर कांबळे यांचे नियोजन सर्वात महत्त्वाचे असते सुधाकर कांबळे ही ज्येष्ठ नेते म्हणून त्यांची ओळख आहे. यावेळी बाबा कांबळे सोबत बाबुराव कांबळे विशाल गवळीसह कार्यकर्ते मोठ्या ताकतीने उभा राहतात व कार्यक्रम यशस्वी करतात दिदुड येथील हा कार्यक्रम डोळ्याचे पारणे फेडणारा दरवर्षीप्रमाणे याही वर्षी उत्कृष्ट कार्यक्रम होणार आहे त्यामुळे समाज बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बाबा कांबळे विशाल गवळी बाबूराव कांबळे भगवान कांबळे महेश लोखंडे लक्ष्मण कांबळे आकाश सोनवणे महादेव कांबळे बाळू कांबळे लखन गवळी बाबू गवळी यांनी केले आहे.

# ना. पंकजाताई मुंडेंनी दिले निर्देश ; जिल्हयातील उद्योजकांच्या मागणीची तातडीने घेतली दखल

## प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक कार्यालयही लवकरच बीडला होणार



मुंबई (दिनांक):- राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील उद्योजकांच्या मागणीची तातडीने दखल घेतली असून त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्ह्यातील उद्योगांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आता आठवड्यातील प्रत्येक बुधवारी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी बीड मध्ये उपलब्ध असणार आहेत. दरम्यान, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक कार्यालय देखील लवकरच बीडमध्ये आणण्यासाठी ना. पंकजाताई मुंडे प्रयत्नशील आहेत.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे मराठवाडा विभागाचे प्रादेशिक कार्यालय सध्या छत्रपती संभाजीनगर येथे असून उप प्रादेशिक कार्यालय जालना, नांदेड, लातूर आणि परभणी येथे आहेत. बीड जालन्याला तर परळी परभणीला जोडलेले आहे. बीडला प्रदूषण नियंत्रण मंडळाचे स्वतंत्र उप प्रादेशिक कार्यालय असावे अशी उद्योजकांची मागणी आहे, त्यानुसार ना. पंकजाताई मुंडे यासाठी प्रयत्नशील असून बीडचे कार्यालय प्रस्तावित आहे.

उप प्रादेशिक अधिकारी दर बुधवारी बीड मध्ये

स्वतंत्र कार्यालय होईपर्यंत जिल्हयातील औद्योगिक व उद्योगांशी संबधित समस्या हाताळण्यासाठी एखादा उप प्रादेशिक अधिकारी असावा अशी उद्योजकांची मागणी होती, त्यानुसार ना. पंकजाताई मुंडे यांनी आज पर्यावरण विभागाला तातडीने निर्देश दिले. यासंदर्भात छत्रपती संभाजीनगरचे पान २ वर...

# मांजरा धरणाचे सहा वक्र दरवाजे उघडले

## धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग,मांजरा नदीकाठच्या नागरिकांनी खबरदारी घ्यावी प्रशासनाचा इशारा

केज (प्रतिनिधी): केज तालुक्यातील मांजरा प्रकल्प धनेगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या संततधार पावसामुळे आणि धरणातील पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी आज दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०-१५ वाजता गेट क्रमांक १ ते ६ प्रत्येकी ०.५० मीटरने उघडण्यात आले आहेत सध्या धरणातून एकूण १०४८२.८४ क्युसेक्स (२९६.८८ क्युमेक्स) इतका विसर्ग सुरू आहे.धरणामध्ये पान २ वर...



# तलवाडा ग्रामपंचायत प्रशासक, ग्रामसेवक आणि महसुल विभाग निंद्रास्त झोपेत

## तलवाडा गाव तलाव फुटण्याचा मार्गावर



तलवाडा (प्रतिनिधी):- तलवाड़ा गाव हे विस ते बावीस हजार लोक संख्येचे असून या गावातील तलाव संरक्षण भिंती लगट बोटावर मोजण्या इतक्या लोकांनी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केलेले आहे या लोकांना पंधरा दिवसांची पहीली नोटीस देण्यात आली होती आता मुदत संपली असताना दुसरी नोटीस का देण्यात येत नाही.हे अतिक्रमण लवकरात लवकर न काढल्यास स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगने यांनी हे जलसमाधी आंदोलन कोणत्याही क्षणी आणि कुठेही करु असा इशारा प्रशासनास याद्वारे देण्यात येत आहे आणि याला जबाबदार तलवाडा पान २ वर...

# दाधिच समाजात ऋषी पौर्णिमा निमित्त रक्षाबंधन उत्साहात साजरा



गेवराई (प्रतिनिधी) गेवराई शहरातील राम मंदिर गल्ली येथील श्री. राम मंदिराच्या सभागृहात दायमा कुटुंबाच्या वतीने ऋषी पंचमी निमित्त रक्षाबंधनाचा कार्यक्रम दि. २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी सात वाजता आयोजित करण्यात आला होता.दाधिच समाजात रक्षाबंधनचा सण हा 'ऋषी पंचमी' या दिवशी साजरा केला जातो, कारण या दिवशी त्यांना ऋषी-मुनींच्या आशीर्वादाने वंश मिळाला असे मानले जाते. या दिवशी, बहिणी पान २ वर...

# आजोबाच्या स्मृतिदिनी शिक्षक दिगांबर आर्दड यांनी दिली विद्यार्थी ग्रंथालयासाठी पाच हजार रुपयांची पुस्तके भेट!



बीड (प्रतिनिधी)- गेवराई शहरातील व तालुक्यातील श्रीपाद अंतर्वाला येथील मूळ रहिवासी असलेले शिक्षक श्री दिगांबर आर्दड सर यांनी आपले आजोबा कै. निवृत्ती लिंबाजी आर्दड यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून इतर विधीच्या होणाऱ्या व्यर्थ खर्चाला फाटा देऊन श्रीपाद आंतरवाला जिल्हा परिषद शाळेच्या बाल विद्यार्थी ग्रंथालयासाठी पाच हजार रुपये किंमतीच्या पुस्तकांचा संच भेट दिला. शाळेसाठी लागणारे शालेय पुस्तके भेट देऊन श्री दिगंबर आर्दड सर यांनी समाजासमोर एक नवीन आदर्श निर्माण केला. त्यांच्याप्रमाणे प्रत्येक नागरिकांनी आपल्या परिसरातील शाळांना आवश्यक शालेय साहित्य देऊन विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य घडविण्यासाठी हातभार लावला पाहिजे असे आवाहन आध्यात्मिक रत्न श्री. विजय महाराज आर्दड यांनी गेवराई तालुक्यातील अंतरवाला जिल्हा परिषद शाळेत पुस्तक वाटपाच्या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना केले. या वेळी व्यासपीठावर श्री. हरिभाऊ निवृत्ती आर्दड, सरपंच उमेश आर्दड,शाळेचे मुख्याध्यापक श्री शेळके सर, ज्ञानोबा बापू आर्दड, आसाराम भाऊ आर्दड,अंकुशराव आर्दड, तूळसिदास भाऊ आर्दड, वैजिनाथ आर्दड, देवीदास जिजा आर्दड, नारायण पान २ वर...






# आघाडीतील शिलेदार आता शहरातील रस्ते तयार करून का घेत नाहीत?

## -एस.एम.युसूफ़, सय्यद इलयास यांचा सवाल



बीड (प्रतिनिधी) - शहरातील काही रस्त्यांची अवस्था ही अक्षरशः ओवाळून फेकल्यासारखी झाली आहे. तरीसुद्धा आघाडीचे शिलेदार याकडे लक्ष देत नाहीत. विशेष म्हणजे या शिलेदारांपैकी बरेचजण आता दस्तूरखुद्द बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री असलेले अजित पवार यांच्यासोबत आहेत. तरीही या शिलेदारांकडून या रस्त्यांसाठी कोणतेही कार्य केले जात नसल्याने जिल्हा रुग्णालय रस्त्याच्या निर्माणावेळी श्रेय घेतलेले शिलेदार या रस्त्यांसाठी का पुढे येत नाहीत? असा सवाल मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि एमआयएम चे सय्यद इलयास यांनी उपस्थित केला आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, जवळपास ३० वर्षांपासून खितपत पडलेल्या जिल्हा रुग्णालयाच्या रस्त्यासाठी १० वर्षात १४ निवेदन, एका वर्षात व्यंगात्मक निषेध, भीक मांगो आणि बेशरम आंघोळ हे तीन आंदोलन आणि प्रसिद्धी माध्यमातून सातत्याने लक्ष वेधणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि एमआयएम चे सय्यद इलयास यांनी पाठपुरावा करत रान उठवले होते, तेव्हा कुठे जिल्हा रुग्णालयाचा रस्ता तयार करण्यात आला. जेव्हा या रस्त्याच्या पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT